# भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस

**कार्यक्रम अहवाल**

**कार्यक्रम: महात्मा ज्योतिराव फुले जयंती**

**स्थळ:** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस

**दिनांक:** ११/०४/२०२६

**वेळ:** सकाळी १०:०० वा **एकूण सहभागीविद्यार्थी:** ५०

**सारांश:**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस येथे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी महात्मा ज्योतिराव फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले यांच्या महान जीवनकार्याला अभिवादन करण्यासाठी तसेच समाजातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्यासाठी करण्यात आले. महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते, थोर समाजसुधारक आणि समानतेचे समर्थक होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. हा विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक ए. हजारे यांच्या हस्ते पार पडला. यानंतर त्यांनी आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. तसेच त्यांनी आपल्या भाषणातून महात्मा फुले यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेत विद्यार्थ्यांना समाजासाठी कार्य करण्याची व शिक्षणाच्या माध्यमातून सकारात्मक परिवर्तन घडवण्याची प्रेरणा दिली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनी कु. हर्षदा मर्ले यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन समन्वयक डॉ. रवींद्र जी. गायकवाड यांनी करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

या कार्यक्रमात अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला, ज्यामुळे कार्यक्रम अधिक प्रेरणादायी आणि यशस्वी ठरला.

छायाचित्रे:







**"प्राचार्य डॉ. अशोक ए. हजारे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख डॉ. रवींद्र जी. गायकवाड यांच्या उपस्थितीत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले."**

---

कार्यक्रम समन्वयक
डॉ. आर. जी. गायकवाड
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

कार्यक्रम संयोजक
प्रा. आर. बी. बसुगडे
प्रा. टी. व्ही. निरवाणे

**डॉ. अशोक ए. हजारे**
**प्राचार्य**